KALANGAN®
निर्मितीचं अनंत आकाश

।। श्री ।।

# गुरुकुल नवी दुनिया - निवासी छंदशाळा

प्रिय पालक स्नेहीजन

सस्नेह नमस्कार,

आमचे कलांगण हे प्रामुख्याने संगीताचे प्रशिक्षण देण्याचे काम करते. त्यामुळे गेल्यावर्षी पासून अभिजात शास्त्रीय कला जसे गायन, वादन, नृत्य शिकणाऱ्या किंवा संगीताची अत्यंत आवड असणाऱ्या ९ ते १५ वर्षे वयाच्या (४ थी ते १० वी) आणि ज्यांना गाणे अधिक कळावे असे वाटते अशा मुलामुलींसाठी '**गुरुकुल नवी दुनिया**' ही निवासी छंदशाळा घेतली जात आहे. गाण्याशी, अभिनय आणि चित्रकलेचा ही संबंध असतो, त्यामुळे यावर्षीही या कलांची किंचित सांगड आपण गाण्याशी या छंदशाळेत घालूच ! पण प्रधान महत्त्व संगीताला असेल. ही गुरुकुल नवी दुनिया छंदशाळा दि. ५ ते १० मे २०१८ या कालावधीत होणार असून अगदी शांत परिसरात आणि टुमदार वास्तुत करण्याचे निश्चित केले आहे.

संगीतशिक्षण पूर्वीच्या काळी गुरुगृही राहून होत असे. संगीत हे जितकं शिकावं तितकं कमीच आहे असं बुजुर्ग मंडळी सांगतात. परीक्षेपुरते एकामागून एक राग शिकले जातात. परंतु संगीताशी संबंधित इतर कितीतरी सुंदर रम्य मजेदार पैलूंना स्पर्श करणं राहूनच जातं. पहिल्यांदा गाणं कसं सुरू झालं ? स्वर शोधले कुणी ? जुन्या काळातल्या गायक गायिकांच्या मेहनतीच्या, कष्टाच्या, अद्भुत, सुरस आणि सुरेल गोष्टी माहित आहेत का तुम्हाला ? त्याचं गाणं ऐकलंय ? या आणि अशाच कितीतरी गोष्टींचा अभ्यास आपण या छंदशाळेत अगदी हसत, खेळत करणार आहोत.

**या छंदशाळेत तुम्ही काय शिकाल ?**

★ स्वरांची ओळख पक्की करण्यासाठी मजेशीर खेळ आणि युक्त्या.

★ तालाचे आणि लयीचे भान आणि जाण

★ काही सुंदर बंदिशी, चतरंग, तराणा, विलंबित ख्याल आणि छोटा ख्याल यांची सखोल ओळख करुन देण्याचा प्रयत्न.

★ जुन्या घराणेदार गायकांचे ध्वनीमुद्रित गायन ऐकणे, चरित्र वाचन.

★ हस्तकला, चित्रे आणि गाणी

★ मान्यवरांचे मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकासाकडे वाटचाल.

**महत्त्वाचे**

★ **प्रवेश फी रु. ९,५००/-** (यामध्ये निवास आणि भोजन व्यवस्था अंतर्भूत आहेत.)

★ मोबाईल, इलेक्ट्रॉनिक गेम्स बरोबर आणण्यास परवानगी नाही.

★ आई बाबांना किंवा नातेवाईकांना शिबिराच्या अधेमधे मुलांना भेटता येणार नाही. फोन करता येणार नाही किंवा मुलांना ही फोन करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

★ **गुरुवार दि. १० मे २०१८** रोजी दुपारी ४ ते ६ या वेळात पाच दिवसात झालेल्या प्रशिक्षणाचा आढावा घेतला जाईल. यासाठी मुलांचा एक छोटासा कार्यक्रम होईल. आणि पालकांच्याबरोबर मुले आपापल्या घरी जातील.

**प्रवेशाचा अंतिम दि. ५ एप्रिल २०१८ व www.kalangan.org वेबसाईटवर फॉर्म उपलब्ध आहेत.**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** त्रिवेणी : 9594962588 प्रीती वायचोळ : 9869025455 मेधा क्षीरसागर : 9594962590 [6 pm to 10 pm]

**प्रवेश अर्ज आणि प्रवेश फी भरण्याचा पत्ता :** (१) प्रिती वायचोळ - शिवाजी पार्क टेलिफोन एक्सचेंज क्वार्टर्स, तळमजला, अनंत पाटील मार्ग, दादर (प), मुंबई 022 2444 5866 (२) हरिभाऊ विश्वनाथ कंपनी - दादर (प) स्टेशनसमोर. फोन : 022 2422 2542 (सोम. बंद)

**प्रवेश फी डिमांड ड्राफ्टने किंवा रोख स्वरूपात भरावी. (चेक स्वीकारले जाणार नाहीत.) डिमांड ड्राफ्ट 'कलांगण संवर्धिनी' या नावाने काढावा.**

**छंदशाळेचे स्थळ, सोबत आणण्याचे सामान व इतर गोष्टी आपले प्रवेश अर्ज पोहोचल्यावर दिनांक २५ एप्रिल २०१८ पर्यंत आपल्याला कळविले जातील.**

मित्रांनो, हसत - खेळत, नाचत - गात आपला दिवस कधी संपेल ते कळणार सुध्दा नाही.
उत्तम मार्गदर्शन आणि दर्जेदार, दीर्घकाळ स्मरणात राहील अशी ही आनंद यात्रा !
तुमच्या प्रतिसादाची वाट पाहत आहोत कळावे,

आपली स्नेहांकित,

**वर्षा भावे**